# कुत्र्यांच्या पाळणाघरांचा वाढतोय 'ट्रेंड'

Varad.Pathak
@timesgroup.com
Tweet : @VaradPathak_MT

**पुणे :** गावाला जायचे आहे, घरी समारंभासाठी खूप पाहुणे येणार आहेत किंवा येणाऱ्या नातेवाइकांना पाळीव प्राणी आवडत नाहीत, अशा वेळी घरातील पाळीव कुत्र्याला कुठे ठेवायचे, असा प्रश्न अनेक नागरिकांना पडतो. त्यांच्यासाठी शहरात 'पेट बोर्डिंग केनेल्स', 'पेट होम स्टे'सारख्या सुविधा देणाऱ्या व्यवसायाने आता चांगलाच जम बसविला आहे. या माध्यमातून कुत्र्यांना राहण्यासाठी स्वच्छ पिंजरे किंवा घरासारखे वातावरण उपलब्ध करून दिले जाते. त्यासाठी दिवसाला तीनशे ते हजार रुपये घेतले जातात. कुत्र्यांना 'पिक अप-ड्रॉप' सेवा, चांगल्या प्रतीचे 'डॉग फूड', खेळण्यासाठी ऐसपैस जागा, जलतरण तलाव, कूलर, व्यायामाची सुविधा, औषधोपचार व वैद्यकीय सुविधा दिल्या जातात. त्यामुळे श्वानपालकांकडून या व्यवसायाला प्रतिसाद मिळत आहे.



> अनेक जण पाळीव प्राण्याला मुलाप्रमाणे सांभाळतात. घराबाहेर ठेवल्यानंतरही त्यांची चांगली निगा राखली जावी, अशीच प्राणीमालकाची इच्छा असते. त्यातूनच पेट बोर्डिंग, डॉग होस्टेल, पेट होम स्टे आदी व्यवसाय सुरू झाले आहेत. केनेलमध्ये प्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून कुत्र्यांची देखभाल केली जाते. त्यांना उत्तम प्रतीचे अन्न, जलतरण तलाव, कूलर आदी सुविधा दिल्या जातात. त्यासाठी प्रतिदिन पाचशे ते सहाशे रुपये घेतले जातात.
>
> – प्रसाद व चित्रा केळकर, पेट बोर्डिंग सुविधा देणारे व्यावसायिक

कुत्रा पाळणे अनेकांना आवडते; पण काही कारणास्तव त्यांना घराबाहेर ठेवायचे असल्यास श्वानपालकांची मोठी अडचण होते. त्यातूनच 'पेट बोर्डिंग फॅसिलिटी'ची व्यावसायिक संकल्पना पुढे आली असून, शहराच्या विविध भागात पाळीव प्राण्यांच्या पाळणाघरांचा 'ट्रेंड' वाढताना दिसत आहे. हिंजवडी-माण भागात पाळीव प्राण्यांसाठी बोर्डिंग सेवा देणाऱ्या शलाका मुंदडा म्हणाल्या, 'अनेकदा लोक बाहेरगावी जाताना त्यांचे कुत्रे 'केनेल' (पिंजरा) मध्ये ठेवतात. 'केनेल'चालकांकडून कुत्र्यांना राहण्यासाठी मोकळे पिंजरे, पोहण्यासाठी जलतरण तलाव आदी सुविधा दिल्या जातात. तज्ज्ञ केअरटेकरद्वारे त्यांची काळजी घेतली जाते. कुत्रे आजारी पडल्यास त्यांची देखभालही केली जाते. नव्या ठिकाणच्या वातावरणाची सवय व्हावी, यासाठी 'ट्रायल स्टे', 'जनरल व्हिजिट'अंतर्गत कुत्र्यांना एक दिवस ठेवून घेतले जाते. आपल्या लाडक्या कुत्र्याला चांगली सेवा मिळत असल्याने श्वानपालकांकडून भरभरून प्रतिसाद मिळत आहे.'

## नवोद्योगनगरी

शहरात फ्लॅट, बंगला, फार्म हाउससारख्या ठिकाणी 'पेट होम स्टे'ची संकल्पना रुजत आहे. बावधन परिसरात एका फार्म हाउसमध्ये 'पेट होम स्टे'ची सेवा देणाऱ्या वंदना पटवर्धन-गोस्वामी म्हणाल्या, 'कुत्र्यांना घरासारखे मोकळे वातावरण पेट होम स्टेमध्ये उपलब्ध करून दिले जाते. प्रेमळ, इतरांमध्ये पटकन मिसळणाऱ्या कुत्र्यांना ठेवण्यासाठी श्वानपालक होम स्टेची निवड करतात; अन्यथा त्यांना केनेलमध्ये ठेवावे लागते. कुत्रे आजारी पडल्यास त्यांच्या मालकांशी बोलून पशुवैद्यकीय तज्ज्ञाकडे नेले जाते.'